जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३८६ दिनांक - २५/०५/२०२३**

युनिट ४, गुन्हे शाखा,पुणे शहर

## खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्हयातील पाहिजे आरोपीकडून पिस्टल व दोन राऊंड जप्त

युनिट-४ कडील पथक हे येरवडा पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलींग करत पर्णकुटी पोलीस चौकी जवळ आले असताना,पथकातील **पोलीस अंमलदार,रमेश राठोड** यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,**येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.६२२/२०२२ भा.द.वि.क.३०७** या गंभीर गुन्हयात पाहीजे असलेला पोलीस रेकॉर्डवरील आरोपी नामे अनिकेत ऊर्फ जुडवा जगन्नाथ काकडे हा येरवडा येथील इराणी मार्केट जवळील शेलार चाळ येथे पिस्टलसह कोणतातरी दखलपात्र गुन्हा करणेचे तयारीत उभा असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

सदरची माहिती पोलीस निरीक्षक,गणेश माने यांना कळवून सपोनि.विकास जाधव हे पथकासह मिळाले माहितीचे ठिकाणी रवाना झाले. इराणी मार्केट जवळ आल्यानंतर पथकातील अधिकारी व अंमलदार हे बातमीचे ठिकाणी जावून खात्री केली असता,बातमीतील आरोपी नामे अनिकेत ऊर्फ जुडवा जगन्नाथ काकडे हा शेलार चाळीचे गेट जवळ उभा असलेला दिसला. पथकातील अंमलदार,रमेश राठोड, नागेशसिंग कुंवर,मनोज सांगळे,संजय आढारी,विनोद महाजन यांनी **अनिकेत ऊर्फ जुडवा जगन्नाथ काकडे,वय-२८ वर्षे,रा.सर्व्हे नं.२,शेलार चाळ,इराणी मार्केटच्या मागे,येरवडा,पुणे** यास शिताफीने ताब्यात घेतले. दोन पंचा समक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेस पँट मध्ये खोचलेली **एक देशी बनावटीची पिस्टल व मॅगझीन मध्ये दोन जिवंत राऊंड असे एकुण ५२,०००/- रू किंमतीचा** मुद्देमाल मिळून आलेने रितसर पंचनाम्याने ते जप्त केले. सदर आरोपी व जप्त मुददेमाल पुढील कायदेशीर कारवाई करीता येरवडा पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक,गणेश माने, सहा.पोलीस निरीक्षक,विकास जाधव, पोलीस अंमलदार,रमेश राठोड,नागेशसिंग कुंवर,संजय आढारी,विनोद महाजन,मनोज सांगळे यांनी केली आहे.